ePaper

## जंतर-मंतरवर आंदोलन करण्याबाबत सुप्रीम कोर्टात याचिका



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 14 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

उद्योजक कुलकर्णी यांच्या उद्योजकीय वाटचालीची राष्ट्रीय स्तरावर दखल!

## RSS संलग्न स्वदेशी जागरण मंचची सरकारकडे मागणी

# 'स्टारलिंक' भारतात नकोच!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**एलॉन मस्क यांच्या 'स्टारलिंक' या सॅटेलाइट इंटरनेट सेवेला भारतात व्यावसायिक कामकाज सुरू करण्याची परवानगी देऊ नये, अशी मागणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संलग्न स्वदेशी जागरण मंचाने केंद्र सरकारकडे केली आहे. स्टारलिंकच्या तंत्रज्ञानामुळे देशातील इंटरनेट सेवांवर नियंत्रण ठेवणे आणि सुरक्षा यंत्रणांना आवश्यक ती देखरेख करणे कठीण होऊ शकते, असा दावा मंचाने केला आहे. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य देऊन या कंपनीच्या भारतातील प्रवेशाबाबत पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे.**




### अमेरिकेला संदेश देण्याचाही प्रयत्न?

स्टारलिंकवरील बंदीचा निर्णय अमेरिकेसह व्यापार भागीदारांना संदेश देणारा ठरेल, असेही 'एसजीएम'ने म्हटले. अमेरिका राष्ट्रीय सुरक्षेचे कारण देत भारतीय वस्तूंवर उच्च आयात शुल्क लावत असेल, तर भारतालाही आपल्या सुरक्षेच्या कारणास्तव स्टारलिंकला रोखण्याचा अधिकार आहे, अशी भूमिका महाजन यांनी मांडली.

### मुकेश अंबानींवर मस्क यांची टीका

स्टारलिंकच्या भारतातील प्रवेशाला होणाऱ्या विलंबावरून मस्क यांनी अलीकडेच रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांच्यावर टीका केली होती. काही प्रभावशाली उद्योगपती स्वतःची मक्तेदारी टिकवण्यासाठी स्टारलिंकच्या प्रवेशात अडथळे आणत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यानंतर 'अंबानी हेच भारताचे खरे बॉस आहेत का?' असा प्रश्नही त्यांनी 'एक्स'वर उपस्थित केला. मात्र, केंद्र सरकारने हे आरोप फेटाळून लावले आहेत. भारताचे नियम निष्पक्ष आहेत. कोणत्याही कंपनीसोबत भेदभाव केला जात नाही, असे सांगत सरकारने हे दावे पूर्णपणे खोटे असल्याचे स्पष्ट केले.

### स्वदेशी तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याची मागणी

स्टारलिंकला परवानगी न दिल्यास दुर्गम भागांमध्ये इंटरनेट सेवा पुरवण्यासाठी स्वदेशी सॅटेलाइट-आधारित तंत्रज्ञान विकसित करण्याची संधी मिळेल, असे 'एसजीएम'ने म्हटले आहे. स्वदेशी सेवा सुरू होण्यास काहीसा विलंब झाला तरी राष्ट्रीय सुरक्षेची काळजी घेत स्टारलिंक पेक्षा कमी खर्चात इंटरनेट सेवा देता येऊ शकते, असा दावा महाजन यांनी केला. भारताने 5G सेवा सुरू करण्याच्या तयारीदरम्यान चीनच्या 'हुवावे' आणि 'झेडटीई' या दूरसंचार उपकरण कंपन्यांना विरोध केल्याचा दाखला देत 'एसजीएम'ने राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर पुन्हा भर दिला.

### 'कायदा-सुव्यवस्थेसाठी इंटरनेटवर निर्बंध आवश्यक'

देशात सध्या विविध कायदा-सुव्यवस्थेची आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा आणि देशविरोधी कथन पसरवले जाऊ शकते, असे 'एसजीएम'चे राष्ट्रीय सहसंयोजक अश्वनी महाजन यांनी म्हटले. दहशतवाद, दंगली आणि आंदोलने यांसारख्या घटनांमध्ये परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी इंटरनेट सेवा खंडित करणे आवश्यक ठरू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

सध्याच्या दूरसंचार कंपन्यांना सरकारी निर्देशांनुसार विशिष्ट भागातील इंटरनेट सेवा बंद करणे शक्य होते. मात्र, स्टारलिंकच्या तंत्रज्ञानात डेटा जमिनीवरील केंद्रांमधून न जाता थेट उपग्रहांदरम्यान प्रवास करू शकतो. त्यामुळे भारतातील इंटरनेट डेटा आणि त्यावरील नियंत्रणासंदर्भात सुरक्षा यंत्रणांसमोर आव्हाने निर्माण होऊ शकतात, अशी भीती मंचाने व्यक्त केली आहे. तथापि, हे संघटनेने उपस्थित केलेले आक्षेप असून कंपनीचे तंत्रज्ञान भारतीय सुरक्षा नियमांचे पालन करू शकत नाही, असा अंतिम निष्कर्ष अद्याप समोर आलेला नाही.

भारत सरकारने स्टारलिंकसह रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेलशी संबंधित युटेलसॅट वनवेब यांना दूरसंचार परवाने दिले आहेत. मात्र, प्रत्यक्ष व्यावसायिक सेवा सुरू करण्यापूर्वी स्पेक्ट्रम वाटप आणि निर्धारित सुरक्षा अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. या कंपन्यांची सुरक्षा तपासणी सुरू असल्याचे दूरसंचार विभागाने स्पष्ट केले आहे. केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी सुरक्षा मंजुरीचा विषय केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत असल्याचे सांगितले आहे.

दरम्यान, भारतात स्टारलिंकच्या प्रवेशाला होणाऱ्या विलंबावरून एलॉन मस्क यांनी उद्योगपती मुकेश अंबानी यांच्यावर टीका केली होती. काही प्रभावशाली उद्योगपती आपली मक्तेदारी कायम ठेवण्यासाठी स्टारलिंकच्या प्रवेशात अडथळे निर्माण करत असल्याचा आरोप त्यांनी केला होता. मात्र, केंद्र सरकारने हे आरोप फेटाळून लावत सर्व कंपन्यांसाठी समान नियम लागू असल्याचे स्पष्ट केले आहे.

स्वदेशी जागरण मंचाने परदेशी तंत्रज्ञानावरील अवलंबित्व कमी करून भारतीय सॅटेलाइट इंटरनेट तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर दिला आहे. दुर्गम आणि ग्रामीण भागांत इंटरनेट सुविधा पोहोचविण्यासाठी स्वदेशी पर्याय विकसित करण्याची मोठी संधी असल्याचे मंचाचे म्हणणे आहे. यासाठी काहीसा विलंब झाला तरी राष्ट्रीय सुरक्षेशी तडजोड करू नये, अशी भूमिका महाजन यांनी मांडली.

अमेरिका राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणावरून भारतीय वस्तूंवर आयात शुल्क किंवा निर्बंध लागू करू शकते, तर भारतालाही आपल्या सुरक्षेच्या हितासाठी परदेशी कंपन्यांच्या प्रवेशाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार असल्याचे मंचाने म्हटले आहे. स्टारलिंकला परवानगी न देण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय व्यापार भागीदारांसाठीही महत्त्वपूर्ण संदेश ठरू शकतो, असे संघटनेचे मत आहे.

# लोकशाहीत मते विकत घेता येत नाहीत

## संवैधानिक मूल्ये पायदळी तुडवली जात आहेत; 'मविआ'च्या ५ उमेदवारांना विजयी करा - सपकाळ

**महाईन्यूज । पुणे**

**भारतीय जनता पक्ष निवडणुकीत पैशांचा वारेमाप वापर करत असल्याचा खेळ सुरू आहे. पैशाच्या जोरावर निवडणुका जिंकता येतात हा त्यांचा अहंकार वाढीस लागला आहे. लोकशाहीत मते विकत घेता येत नाहीत हे दाखवून द्या आणि महाविकास आघाडीच्या पाचही उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.**



पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा. जयंत आसगावकर, हर्षदा देशमुख-जाधव यांच्या प्रचारासाठी पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात प्रचार मेळावा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवार या मेळाव्याला ऑनलाईन उपस्थित होते. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री विश्वजित कदम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी मंत्री जयंत पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आमदार बापुसाहेब पठारे, उल्हास पवार,मोहन जोशी, प्रभाकर देशमुख, अंकुश काकडे, काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, दीप्ती चौधरी आदी उपस्थित होते.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, लोकशाही व संवैधानिक मूल्ये पायदळी तुडवली जात आहेत, या कठीण परिस्थितीत चांगले व हुशार लोकप्रतिनिधी सभागृहात गेले पाहिजेत. पदवीधर व शिक्षकांचे प्रश्न आहेत, त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी या प्रतिनिधींना सभागृहात पाठवले पाहिजे.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, शिक्षण क्षेत्राचा खेळखंडोबा झाला आहे. भाजपा सरकार विरोधात देशातील युवा पिढी व जनता रस्त्यावर आली आहे. भाजपा सरकारचे खरे स्वरुप समोर आलेले आहे पण भ्रमात राहू नका, शेवटपर्यंत काम करा, मतदारांना मतदानासाठी बाहेर काढा. यावेळी महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांनी शिक्षक आणि पदवीधर मतदारांच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यांच्या हक्कांसाठी सक्षमपणे आवाज उठवण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच, आगामी निवडणुकीत उमेदवारांच्या विजयासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने आणि जोमाने प्रचार करून मतदारांपर्यंत पोहोचावे, असे आवाहन करण्यात आले.

### पदवीधर, शिक्षकांचे प्रश्न सोडविणाऱ्या नेतृत्वाला संधी द्या

पदवीधर आणि शिक्षकांचे प्रश्न समजून घेऊन ते सोडविणाऱ्या नेतृत्वाला संधी देण्याची गरज आहे. पदवीधरांचे प्रश्न समजून घेऊन ते सोडविणाऱ्या नेतृत्वाला संधी देण्याची गरज आहे. चांगला जनसंपर्क असलेल्या हर्षदा जाधव आणि जयंत आसगावकर यांना विजयी करा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.

### माजी मंत्री सतेज पाटील मेळाव्याला गैरहजर

माजी मंत्री, विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील गोकुळच्या निवडणुकीत व्यस्त आहेत. त्यामुळे या मेळाव्याला उपस्थित नसल्याचे स्पष्ट करत, त्यांच्या गैरहजेरीबद्दल गैरसमज करू नये असे माजी मंत्री विश्वजित कदम यांनी केले.

# पुण्यातील प्रसिद्ध 'गार्डन वडापाव'सह चार उपाहारगृहांवर FDA ची कारवाई

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील प्रसिद्ध गार्डन वडापाव सेंटरमधील अस्वच्छता आणि निकृष्ट दर्जाच्या खाद्यतेलाचा वापर उघडकीस आल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) संबंधित आस्थापनेवर धडक कारवाई केली. नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी गार्डन वडापावसह चार आस्थापनांना व्यवसाय बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर पुणे, सोलापूर आणि सांगली जिल्ह्यांतील सहा आस्थापनांमधून तब्बल ९ हजार ६७५ किलो खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला. या तेलाची किंमत २१ लाख ९४ हजार रुपये आहे. अशी माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.**




अन्न व औषध प्रशासनाने १० आणि ११ ऑक्टोबर रोजी ही कारवाई केली. खाद्यतेलाच्या साठ्यांची तपासणी करताना संशयित निकृष्ट दर्जाचे तेल आढळल्याने साठा जप्त करण्यात आला. तसेच हॉटेल आणि ढाब्यांमधील स्वच्छता व अन्नसुरक्षेच्या नियमांची तपासणी करण्यात आली. यामध्ये पुण्यातील मार्केट यार्ड मधील मे. बंसल ट्रेडिंग कंपनी यांच्याकडे सहा लाख ३८ हजार पाचशे रुपयांचा एक हजार ६१ किलोचा तर मे. रमेश लाल अँड सन्स यांच्याकडून सहा लाख, ६७ हजार २१९ रुपये किमतीचा दोन हजार १०९ किलो निकृष्ट दर्जाचा तेल साठा जप्त करण्यात आला.

एफडीएच्या पथकाने पुणे विभागातील सात हॉटेल आणि ढाब्यांची तपासणी केली. लोहगाव येथील पंजाबी ढाबा, कोंढवा येथील खान-ए-खास हॉटेल आणि उरुळी देवाची येथील हॉटेल सोनाई येथे स्वच्छतेविषयक नियमांचे उल्लंघन आढळले. खाद्यपदार्थांची गुणवत्ता आणि स्वच्छतेच्या नियमांचे पालन केले जात आहे की नाही, याची तपासणी प्रशासनाकडून करण्यात येत आहे. खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत किंवा अन्नविषयक गैरप्रकारांबाबत नागरिकांना तक्रार करायची असल्यास १८००२२२३६५ या टोल फ्री क्रमांकावर किंवा complaints. mahafda.in या संकेतस्थळावर संपर्क साधावा, असे आवाहन एफडीएकडून करण्यात आले आहे. या कारवाईमुळे खाद्यतेलाच्या साठेबाजीवर तसेच निकृष्ट दर्जाच्या खाद्यपदार्थांच्या विक्रीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने प्रशासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून अशा तपासणी मोहिमा यापुढेही सुरू ठेवण्यात येणार आहेत.

### गार्डन वडापावसह चार आस्थापनांना आदेश

पुण्यातील कॅम्प परिसरातील प्रसिद्ध गार्डन वडापाव सेंटरमध्ये अस्वच्छता आणि निकृष्ट दर्जाच्या खाद्यतेलाचा वापर आढळल्याने व्यवसाय बंद करण्याचे निर्देश देण्यात आले. पिंपरी-चिंचवडमधील थेरगाव येथील बालाजी साउथ इंडियन फूड, रहाटणी येथील इंजिनिअर वडेवाले अँड थाळी आणि जी. के. हॉटेल युअर हेज या आस्थापनांवरही कारवाई करण्यात आली. अन्नसुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन केल्याने या आस्थापनांना व्यवसाय बंद करण्याचे निर्देश दिले आहेत.

# आ. महेश लांडगे यांच्या हिंदुत्वनिष्ठ कार्यावर गौरवाची मोहोर!

## ‘क्रांतिवीर वसंतदादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार’ जाहीर; १८ ऑक्टोबरला गौरव सोहळा!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांना यंदाचा ‘क्रांतिवीर वसंतदादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार’ घोषित करण्यात आला आहे. हिंदुत्वविषयक कार्य आणि गोरक्षणासाठी घेतलेल्या भूमिकेची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आल्याचे आयोजकांनी म्हटले आहे. रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी सात वाजता पंढरपूर येथे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.**




श्री विठ्ठल मंदिराशेजारील क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या पुतळ्याजवळ हा सोहळा होणार असून, चंद्रशेखर महाराज देगलूरकर आणि उपस्थित साधुसंतांच्या हस्ते आमदार लांडगे यांचा गौरव करण्यात येईल. मानाचे महावस्त्र, कुंडलिनी-कृपाणांकित भगवा ध्वज आणि अकरा हजार रुपये रोख, असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त हिंदुत्वविषयक कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, बडवे यांनी स्वातंत्र्यलढा, गोवामुक्ती लढा आणि मराठवाडा मुक्ती लढ्यात योगदान दिले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर, भालजी पेंढारकर, सुधीर फडके आणि बाबासाहेब पुरंदरे यांच्याशी त्यांचा सहवास होता. पंढरपूरमधील सामाजिक व तालीम क्षेत्रातील कार्यासोबतच १९५६ च्या महापुरातील बचावकार्यासाठीही त्यांचे स्मरण केले जाते.

आमदार लांडगे यांनी गोरक्षण आणि हिंदुत्वाशी संबंधित विषयांवर सार्वजनिक जीवनात तसेच विधानसभेत घेतलेल्या भूमिकांचा पुरस्कार निवडीसाठी विचार करण्यात आल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकासाठी सुरू असलेले त्यांचे प्रयत्न आणि स्मारकाच्या निमित्ताने आयोजित ढोल-ताशा मानवंदना सोहळ्याचाही आयोजकांनी उल्लेख केला आहे.

यापूर्वी मिलिंद एकबोटे, शिवशंकर स्वामी, धनंजय देसाई, अभय वर्तक, संजीव पुनाळेकर, प्रमोद मुतालिक आणि प्रसिद्ध कन्नड लेखक एस. एल. भैरप्पा यांच्यासह विविध मान्यवरांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली. पुरस्कार वितरण सोहळ्यास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन क्रांतिवीर वसंतदादा बडवे स्मारक मंडळाचे अध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी-इचगावकर, पत्रकार व माजी नगरसेवक महेश खिस्ते, विवेक बेणारे आणि शहर हिंदू महासभेचे अध्यक्ष विकास मोरे यांनी केले आहे.

> “क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या नावाने दिला जाणारा ‘हिंदुत्व शौर्य पुरस्कार’ घोषित होणे, हा माझ्यासाठी अभिमानाचा आणि जबाबदारी वाढविणारा क्षण आहे. राष्ट्रसेवा, समाजसेवा आणि हिंदुत्वनिष्ठेचा त्यांचा वारसा प्रेरणादायी आहे. हा सन्मान माझ्यासोबत कार्य करणाऱ्या प्रत्येक सहकाऱ्याचा आणि माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांचा आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन गोरक्षण, संस्कृतीचे जतन आणि जनसेवेसाठी अधिक निर्धाराने कार्य करत राहीन. या सन्मानासाठी स्मारक मंडळाचे मनःपूर्वक आभार!”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# उद्योजक प्रसाद कुलकर्णी यांच्या उद्योजकीय वाटचालीची राष्ट्रीय स्तरावर दखल!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**जल व सांडपाणी व्यवस्थापनाच्या क्षेत्रात सुमारे दोन दशकांचा अनुभव असलेले डब्ल्यूटीई इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि.चे संस्थापक व संचालक प्रसाद कुलकर्णी यांच्या उद्योजकीय वाटचालीची ‘स्टार्टअपनेक्स्ट’च्या ‘फोर्टी ओव्हर फोर्टी’ या विशेष लेखातून दखल घेण्यात आली आहे. वयाच्या चाळिशीनंतर व्यवसायवृद्धी आणि नवकल्पनांना चालना देणाऱ्या ४० नेतृत्वकर्त्यांचा परिचय या लेखात करून देण्यात आला असून, त्यामध्ये कुलकर्णी यांच्या कार्याचा समावेश आहे.**

उद्योजक प्रसाद कुलकर्णी यांच्या कार्याची ‘हिंदुस्थान टाईम्स’मध्ये प्रसिद्ध झालेल्या विशेष लेखातून दखल घेण्यात आली आहे. ‘STARTUPNXT FEATURES 40 LEADERS DRIVING GROWTH AND INNOVATION AFTER 40’ या शीर्षकाच्या लेखात डब्ल्यूटीई इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि.चे संस्थापक व संचालक कुलकर्णी यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यांच्या सुमारे दोन दशकांच्या अनुभवासह व्यवसायवृद्धी, नवकल्पना आणि शाश्वत विकासासाठीच्या योगदानाचा लेखात आढावा घेण्यात आला आहे.

‘हिंदुस्थान टाईम्स’वरील एचटी ब्रँड स्टुडिओच्या १२ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या या लेखात वयाच्या चाळिशीनंतर अनुभवाच्या बळावर व्यावसायिक आव्हानांना सामोरे जाणाऱ्या आणि नव्या संधींचा उपयोग करणाऱ्या ४० नेतृत्वकर्त्यांचा परिचय देण्यात आला आहे. त्यातील ‘WATER, INFRASTRUCTURE & SUSTAINABILITY’ या विभागात कुलकर्णी यांच्या उद्योजकीय वाटचालीला स्थान मिळाले आहे.

### नवकल्पना आणि जबाबदार विकासावर भर

कुलकर्णी यांच्या कार्याचा परिचय देताना नवकल्पना, जबाबदार पायाभूत सुविधा विकास आणि शाश्वत वाढीसाठी तंत्रज्ञानाधारित उपाय यांना लेखात महत्त्व देण्यात आले आहे. त्यांच्या व्यवस्थापनविषयक दृष्टिकोनातून व्यावसायिक आणि उद्योजकांना प्रेरणा मिळत असल्याची नोंदही करण्यात आली आहे. जलव्यवस्थापन आणि पर्यावरणाशी निगडित पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या पुण्याच्या उद्योजकाची वाटचाल या विशेष लेखाच्या माध्यमातून राष्ट्रीय वाचकांसमोर आली आहे.




> “तब्बल २०५ कोटींहून अधिक उलाढालीचा व्यावसायिक प्रवास सांभाळताना एक गोष्ट शिकलो. खरी प्रगती पद, गाडी किंवा श्रीमंतीत मोजता येत नाही; ती माणसांशी जपलेल्या नात्यांत दिसते. ज्येष्ठांच्या अनुभवातून शिकत, नवे तंत्रज्ञान स्वीकारत पुढे जातानाही साधेपणा आणि आपलेपणा टिकला पाहिजे. शेवटी, प्रवास कोणत्या गाडीतून केला यापेक्षा तो कोणासोबत केला, हेच अधिक महत्त्वाचे असते.”
>
> **- प्रसाद कुलकर्णी, संस्थापक व संचालक, WTE INFRA PROJECTS PVT. LTD.**

### विशेष जलप्रक्रिया व्यवसायातून व्यापक अभियांत्रिकी सेवांकडे

लेखात नमूद केल्यानुसार, पुणेस्थित डब्ल्यूटीई इन्फ्रा प्रोजेक्ट्स ही कंपनी जल आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात कार्यरत आहे. विशेष जलप्रक्रिया व्यवसायातून औद्योगिक आणि सार्वजनिक क्षेत्रातील ग्राहकांना अभियांत्रिकी व पायाभूत सुविधांशी संबंधित उपाय पुरवणारी कंपनी म्हणून तिचा विस्तार करण्यात कुलकर्णी यांनी योगदान दिले आहे. भारताच्या बदलत्या जलविषयक गरजांना प्रतिसाद देण्यासाठी उपाय विकसित करण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाचा लेखात उल्लेख आहे. व्यावसायिक रणनीती, प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि संस्थात्मक वाढ यांचा समन्वय साधण्यावर त्यांचा भर असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

# मैना उडून गेली... मराठी कलाविश्वाचा पिंपळ उदास झाला!



## भूमिका

**तमाशाच्या फडातून रुपेरी पडद्यापर्यंतचा थक्क करणारा प्रवास; संघर्ष, जिद्द आणि अभिनयाच्या सामर्थ्याने स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या मधू कांबीकर यांच्या आठवणींचा भावस्पर्शी जागर!मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात काही कलाकार केवळ अभिनयामुळे मोठे होत नाहीत, तर आपल्या संघर्षातून, जिद्दीतून आणि माणुसकीतून एक स्वतंत्र पर्व निर्माण करतात.**

ज्येष्ठ अभिनेत्री आणि नृत्यांगना मधू कांबीकर हे असेच एक व्यक्तिमत्त्व. तमाशाच्या फडातून सुरू झालेला त्यांचा कलाप्रवास मराठी चित्रपटसृष्टीतील महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. त्यांच्या निधनामुळे केवळ एक अभिनेत्री काळाच्या पडद्याआड गेलेली नाही, तर लोककलेचा जिवंत वारसा, संघर्षाचे प्रतीक आणि असंख्य कलाकारांसाठी प्रेरणास्थान असलेले व्यक्तिमत्त्व हरपले आहे.

'राघू मैना' चित्रपटातील मैना साकारणाऱ्या मधू कांबीकर यांच्या आठवणींना उजाळा देताना व्यक्त झालेली व्यथा मनाला चटका लावणारी आहे. 'मैना उडून गेल्यानं माझा उदास पिंपळ' या काव्यपंक्तीतील वेदना आज त्यांच्या सहवासातील प्रत्येकाच्या मनात दाटून आल्या असतील. काही माणसे आयुष्यातून निघून जातात; पण त्यांच्या आठवणींचा सुगंध कधीच संपत नाही. मधू कांबीकर यांचे आयुष्य म्हणजे याच भावनेचे मूर्तिमंत उदाहरण!



तमाशाच्या फडातील नृत्यांगना ते प्रतिष्ठित चित्रपट अभिनेत्री हा प्रवास सहजसाध्य नव्हता. त्यामागे अपार मेहनत, कलेवरील निष्ठा आणि परिस्थितीशी दोन हात करण्याची विलक्षण जिद्द होती. 'शापित', 'एक होता विदूषक', 'रावसाहेब', 'माझं माहेर' आणि 'राघू मैना' यांसारख्या चित्रपटांतून त्यांनी आपल्या अभिनयाची स्वतंत्र छाप उमटवली. लोककलेतील अनुभवाला अभिनयाची जोड देत त्यांनी पडद्यावर साकारलेल्या व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या स्मरणात कायम राहिल्या.

लोणारच्या सरोवर परिसरातील चित्रीकरणाचा प्रसंग त्यांच्या कार्यनिष्ठेची साक्ष देतो. दगडधोंड्यांतून कठीण वाट तुडवत खाली उतरायचे, दिवसभर चित्रीकरण करायचे आणि थकलेल्या शरीराने पुन्हा वर चढायचे. एवढ्यावर त्यांचे परिश्रम थांबत नसत. दोन घास खाऊन पुन्हा रात्रीच्या लावणी चित्रीकरणासाठी त्या सज्ज होत. थकव्याची तक्रार नाही, परिस्थितीबद्दल नाराजी नाही. चेहऱ्यावर हास्य आणि मनात काम पूर्ण करण्याचा निर्धार! हीच त्यांची खरी ओळख होती.

कलेच्या क्षेत्रात प्रसिद्धी मिळवणे आणि ती टिकवणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. मधू कांबीकर यांनी मात्र प्रसिद्धीपेक्षा परिश्रमाला अधिक महत्त्व दिले. अभिनयातील सहजता, नृत्यातील लयबद्धता आणि अभिव्यक्तीतील जिवंतपणा ही त्यांच्या कलेची वैशिष्ट्ये होती. पारंपरिक लोककलेतील कसब त्यांनी चित्रपटाच्या पडद्यावर प्रभावीपणे साकारले. लोककलावंतांबद्दल समाजात असलेल्या पूर्वग्रहांवर त्यांनी आपल्या कर्तृत्वाने उत्तर दिले.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे माणुसकी. स्वतःच्या कष्टातून मिळवलेले यश त्यांनी केवळ स्वतःपुरते मर्यादित ठेवले नाही. कुटुंबीय, नातेवाईक आणि आप्तस्वकीयांना आधार देत त्यांनी नाती जपली. यशाच्या शिखरावर पोहोचूनही माणसांशी असलेली नाळ तुटू दिली नाही. म्हणूनच त्यांच्या आठवणींमध्ये कलाकाराइतकीच माणूस म्हणून असलेली त्यांची श्रीमंती ठळकपणे जाणवते.

मधू कांबीकर यांचा जीवनप्रवास समाजासाठी एक महत्त्वाचा संदेश देऊन जातो. जन्माची परिस्थिती माणसाचे भवितव्य निश्चित करत नाही. प्रतिकूलतेवर मात करण्याची इच्छाशक्ती, कष्ट करण्याची तयारी आणि स्वतःच्या गुणांवरील विश्वास माणसाला मोठे करतो. लोककलेच्या मातीतून फुललेली ही कलावंत अखेरपर्यंत आपल्या कर्तृत्वाचा सुगंध पसरवत राहिली.

मृत्यूने त्यांच्या जीवनप्रवासाला पूर्णविराम दिला असला, तरी त्यांच्या कलेला आणि आठवणींना पूर्णविराम देता येणार नाही. कारण खरी कला काळाच्या मर्यादा ओलांडून जगत असते. मधू कांबीकर यांची मैना उडून गेली असली, तरी तिच्या पंखांचा आवाज मराठी रसिकांच्या मनात कायम घुमत राहील. कलाविश्वाचा पिंपळ आज उदास आहे; पण त्याच्या प्रत्येक पानावर मधू कांबीकर यांच्या कर्तृत्वाची आठवण कायम सळसळत राहील!

## प्रासंगिक »

### खरा मोठेपणा!

**एका गावात राम आणि श्याम नावाचे दोन मित्र राहत होते. राम खूप श्रीमंत होता, तर श्याम गरीब असूनही मनाने उदार होता.**

रामला आपल्या संपत्तीचा प्रचंड गर्व होता. तो नेहमी गरीब लोकांना कमी लेखायचा. श्याम मात्र सर्वांशी प्रेमाने वागायचा आणि गरजूंना मदत करायचा.

एके दिवशी गावात मुसळधार पाऊस पडला. नदीला पूर आला. रामचे घर पाण्याने वेढले गेले. जीव वाचवण्यासाठी तो मदतीची याचना करू लागला. अनेकांनी प्रयत्न केले; पण पाण्याचा प्रवाह प्रचंड होता. हे पाहून श्यामने धाडस केले. त्याने दोरीच्या साहाय्याने रामला सुरक्षित बाहेर काढले.

रामचे डोळे पाणावले. तो म्हणाला, "माझ्याकडे अफाट संपत्ती आहे; पण आज माझे प्राण तुझ्या माणुसकीमुळे वाचले."

त्या दिवसापासून रामचा स्वभाव बदलला. त्याने संपत्तीचा गर्व सोडला आणि गरिबांच्या मदतीसाठी पुढाकार घेण्यास सुरुवात केली. गावकऱ्यांनाही त्याच्यातील बदल पाहून आनंद झाला.

- तात्पर्य : **संपत्ती माणसाला श्रीमंत बनवते; पण माणुसकी त्याला खऱ्या अर्थाने मोठे बनवते!**

महाराष्ट्रातील लाखो तरुणांच्या भविष्याशी जोडलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा प्रक्रियेतील त्रुटींविरोधात पुण्यात सुरू असलेले आंदोलन अखेर मागे घेण्यात आले.

## आश्वासन दिले, आता कृती करा!

राज्य सरकारने आंदोलकांच्या मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिल्याने संघर्षाला तात्पुरता विराम मिळाला आहे. मात्र, आंदोलन मागे घेणे म्हणजे प्रश्न सुटले, असे अजिबात नाही. उलट, सरकारने दिलेल्या शब्दाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची खरी परीक्षा आता सुरू झाली आहे. कारण हा विषय केवळ परीक्षा व्यवस्थेचा नसून लाखो तरुणांच्या भविष्याचा आणि शासनावरील विश्वासाचा आहे.

आमदार रोहित पवार आणि विश्वजित कदम यांनी आंदोलनात सक्रिय सहभाग घेत विद्यार्थ्यांच्या मागण्या सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वतीने सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी आंदोलकांना लेखी आश्वासने दिली. एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून निर्माण झालेला पेच त्यांनी चौकशी पूर्ण होईपर्यंत रजेवर जाण्याची भूमिका घेतल्याने निवळला. सरकार आणि आंदोलकांनी सामंजस्याचा मार्ग स्वीकारला, ही स्वागतार्ह बाब आहे. पेपरफुटीच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या



अध्यक्षतेखाली आयोग नेमण्याचा निर्णय महत्त्वाचा आहे. या आयोगाच्या सचिवपदी तुकाराम मुंढे यांच्यासारख्या कर्तव्यकठोर अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यामागे चौकशीची विश्वासार्हता वाढविण्याचा प्रयत्न दिसतो. त्याचप्रमाणे अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे विद्यार्थ्यांकडून आलेल्या ३० हजारांहून अधिक सूचनांचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. मात्र, समित्या नेमणे म्हणजे सुधारणा नव्हे. त्यांच्या शिफारशींची अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते, यावरच व्यवस्थेचे भवितव्य अवलंबून आहे.

स्पर्धा परीक्षांची तयारी करणारा विद्यार्थी केवळ स्वतःसाठी झगडत नसतो. त्याच्या पाठीशी आई-वडिलांचे कष्ट, कुटुंबाची आर्थिक ओढाताण आणि उज्ज्वल भविष्याची स्वप्ने असतात. वर्षानुवर्षे अभ्यास करूनही पेपरफुटी, परीक्षांमधील अनिश्चितता, निकालांचा विलंब आणि भरती प्रक्रियेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले जाते. त्यामुळे त्यांना विशेष सवलती नकोत; समान संधी, पारदर्शक परीक्षा आणि वेळेवर न्याय हवा आहे. ही अपेक्षा अवास्तव नसून त्यांचा अधिकार आहे.

सरकारने आता प्रत्येक भरती प्रक्रियेचे निश्चित वेळापत्रक जाहीर केले पाहिजे. रिक्त पदांची संख्या, जाहिराती, परीक्षा, निकाल आणि प्रत्यक्ष नियुक्ती या प्रत्येक टप्प्यावर स्पष्ट कालमर्यादा असावी. पेपरफुटी रोखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, कठोर सुरक्षा उपाय आणि दोषींवर प्रभावी कारवाई आवश्यक आहे. चौकशीचा अहवाल केवळ सरकारी दप्तरात न राहता त्यातून ठोस सुधारणा घडल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेऊन सरकारवर विश्वास दाखविला आहे. आता तो विश्वास सार्थ ठरविण्याची जबाबदारी सरकारची आहे. लेखी आश्वासन म्हणजे केवळ प्रशासकीय दस्तऐवज नाही, तर लाखो तरुणांच्या भविष्याशी केलेला करार आहे.

आंदोलन थांबले म्हणून सरकारने समाधानी होऊ नये. कारण तरुणाईला आता आणखी आश्वासने नकोत, तर परिणाम हवेत. सरकारने शब्द दिला आहे; आता तो कृतीतून सिद्ध करावा!

## ।। अभंगवाणी ।।



हो का पुत्र पत्नी बंधु ।
त्यांचा तोडावा संबंधु ॥१॥

कळों आलें खट्याळसें ।
शिवों नये लिंपों दोषें ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# उद्योगांच्या गुंतवणूकीत महाराष्ट्र आघाडीवर

## महाराष्ट्रातील गुंतवणूक आणि तंत्रज्ञानाचा विस्तार करण्यासाठी ब्रिटनमधील शिष्टमंडळासोबत चर्चा

**महाईन्यूज । मुंबई**

**कौशल्य, भांडवल आणि तंत्रज्ञानाची सांगड घालणाऱ्या ठोस गुंतवणुकीसाठी महाराष्ट्रात उत्कृष्ट परिसंस्था कार्यरत आहे. सर्वच क्षेत्रातील उद्योगांच्या गुंतवणुकीसाठी असलेल्या परिसंस्थेच्या निर्मितीत महाराष्ट्र हा सर्वात आघाडीवर आहे, या शब्दात महाराष्ट्राचे महत्व अधोरेखित करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युनायटेड किंगडममधील संस्था आणि उद्योजकांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले.**



गुंतवणूकदारांचे प्रकल्प वेगाने पुढे नेण्यासाठी ‘इन्व्हेस्ट महाराष्ट्र’ व्यासपीठाच्या माध्यमातून सर्व संबंधित यंत्रणांशी तातडीने समन्वय साधला जाईल. यूके मधील सचिव, महापौर व अधिकारी यांचा हा दौरा केवळ औपचारिक भेट नसून दोन्ही देशांमधील महत्वाकांक्षेचे प्रत्यक्ष व्यवसाय आणि करारांमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

हॉटेल ताज पॅलेस येथे आयोजित महाराष्ट्र-यूके भागीदारी शुभारंभ कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबळगण, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, युनायटेड किंगडमचे व्यवसाय, नवोन्मेष, विज्ञान आणि व्यापार राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स उपस्थित होते.

यूकेच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळासोबत झालेल्या द्विपक्षीय चर्चांनंतर विविध महत्वाच्या क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्यासाठी महाराष्ट्र आणि यूके दरम्यान झालेल्या सामंजस्य कराराचे आदान प्रदान करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबई आंतरराष्ट्रीय वित्त, व्यापार आणि उद्योजकतेला जागतिक बाजारपेठांशी थेट जोडते. पुणे हे अभियांत्रिकी, वाहन उद्योग, उत्पादन आणि माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र बनले आहे. राज्यभरातील कुशल मनुष्यबळ, सक्षम औद्योगिक समूह आणि जागतिक ग्राहकांना सेवा देणाऱ्या अनुभवी भागीदारांचे मजबूत जाळे ही महाराष्ट्राची ताकद आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे परदेशी विद्यापीठांना महाराष्ट्रात कॅम्पस सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे. ‘युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टल’, ‘युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क’ आणि ‘युनिव्हर्सिटी ऑफ ॲबर्डिन’ यासारखी जागतिक विद्यापीठे महाराष्ट्रात येत आहेत. राज्यात उभारण्यात येणाऱ्या एज्युसिटी, मेडिसिटी आणि एआय इनोव्हेशन सिटीमुळे जागतिक दर्जाचे संशोधन, संस्था आणि प्रतिभा एकत्र येतील.

### राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स काय म्हणाले

राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स म्हणाले, यूकेच्या ज्या कंपन्या भारतीय बाजारपेठेत प्रवेश करू इच्छितात, त्यांच्यासाठी महाराष्ट्र हे सर्वात नैसर्गिक आणि योग्य ठिकाण आहे. या राज्याची निवड त्याच्या स्पष्ट आर्थिक ताकदीमुळे, राजकीय स्थैर्य आणि नेतृत्वामुळे केली आहे. राज्याची अर्थव्यवस्था ही युरोपमधील नॉर्वे देशापेक्षाही मोठी आहे. महाराष्ट्रात केवळ एका कागदावर स्वाक्षरी करण्यासाठी आलेलो नाही, तर आम्हाला प्रत्यक्ष परिणाम आणि यश हवे आहे. दोन्ही बाजूंच्या लोकांनी एकत्र येऊन हे काम पुढे न्यावे आणि दोन्ही देशांच्या प्रगतीला गती द्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रात औद्योगिक कार्बन उत्सर्जन कमी करणे, ऊर्जा कार्यक्षमता, पाणी व्यवस्थापन, वाहतूक आणि साधनसंपत्तीचे पुनर्नवीकरण यासारख्या स्वच्छ ऊर्जा प्रकल्पांना मोठा वाव आहे. जागतिक कंपन्यांना त्यांची ‘ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स’ आणि तंत्रज्ञान संशोधन केंद्रे महाराष्ट्रात उभारण्यासाठी राज्य शासन पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील स्थानिक उत्पादक, अन्नप्रक्रिया उद्योग, तंत्रज्ञान कंपन्या आणि लघुउद्योजकांना ब्रिटनमध्ये नव्या बाजारपेठा व ग्राहक मिळविण्याची संधी उपलब्ध होईल. येत्या काळात महाराष्ट्र आणि ब्रिटनमधील संबंध करारांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष उद्योग, व्यवसाय आणि रोजगारनिर्मितीतून अधिक दृढ होतील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# ऊस दर प्रश्नासाठी महामार्गावर आंदोलन सुरू; कोल्हापूर, सांगलीत आंदोलन तापले

**महाईन्यूज । कोल्हापूर**

**केंद्र सरकारसोबत झालेली चर्चा निष्फळ ठरल्यानंतर मंगळवारी महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील कोगनोळी टोल नाक्यावर ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले. माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनामुळे पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे.**



स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या २५ व्या ऊस परिषदेत ठरल्याप्रमाणे साखरेचा किमान विक्री हमी भाव प्रतिकिलो ५० रुपये करावा, सी-हेवी मोलॅसिसपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करावा आणि लवकर गळीत हंगाम सुरू होत असल्याने शेतकऱ्यांना प्रतिटन ५०० रुपये अनुदानसह प्रतिटन ५ हजार रुपये दर मिळावा या तीन प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे.

काल नवी दिल्ली येथे केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी आणि केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासोबत झालेल्या तीन तासांच्या बैठकीत कोणताही ठोस निर्णय न होता केवळ एका आठवड्यात समिती स्थापन करून निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. बैठक निष्फळ ठरल्यानंतर आज कोगनोळी टोल नाक्यावर हजारो शेतकरी दाखल झाले. यावेळी राजू शेट्टी यांनी केंद्र सरकार लेखी निर्णय जाहीर करत नाही तोपर्यंत महामार्ग एक इंचही मोकळा केला जाणार नाही, १५ नोव्हेंबरपूर्वी एकही साखर कारखाना सुरू

### रस्त्यावरच पंगती; आंदोलन पसरले

आंदोलन बेमुदत चालणार असल्याने महामार्गावरच अन्नछत्र आणि जेवणाच्या पंगतींची तयारी करण्यात आली आहे. कागल, निपाणी तालुक्यातील गावांमधून भाकरी-पिठलं गोळा करून तिथेच मुक्काम ठोकण्याची तयारी करण्यात आली आहे. आंदोलक शेतकऱ्यांनी महामार्गावरच पंगत टाकून जेवण केले. कोगनोळी सोबतच हत्तरगी, कराड, सातारा, इंदापूर आणि कर्नाटकातील हुबळी, गदग परिसरातही महामार्ग रोखण्यात आले आहे.. पोलिस प्रशासनाने वाहतूक पर्यायी मार्गाने वळवली आहे. पलूस तालुक्यात शंभरावर उसाची वाहने अडवण्यात आल्याचे सांगण्यात आले. भर उन्हातील आंदोलनात शेतकऱ्यांचा मोठा सहभाग असल्याने मोठ्या छावणीचे स्वरूप आले आहे.

करू देणार नाही. तातडीने तोडगा न काढल्यास कारखान्यातून बाहेर पडणारी साखरही अडवण्याचा, आंदोलन उग्र करण्याचा इशारा दिला आहे. राज्य साखर संघाचे माजी अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी साखर कारखाने अडचणीत असल्याचा संदर्भ देत राजू शेट्टी यांना उद्देशून पहिली उचल ५ हजार रुपये द्यायला तुमच्या काकाने ठेवलेत का, अशा शब्दांत फटकारले. त्यावर राजू शेट्टी यांनी, उसाचा दर जाहीर न करता ऊस तोडायला ती काय तुमच्या बापाची पेंड आहे का, असा संतप्त पलटवार केला.

# अफगाणिस्तानने थेट चीनपर्यंत बांधला रस्ता

## तालिबान सरकारने चीनच्या सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या वाखान कॉरिडॉरमधील नवीन रस्त्याचे केले उद्घाटन

**महाईन्यूज । अफगाणिस्तान**

**गेल्या आठवड्यात अफगाणिस्तानमधील तालिबान सरकारने चीनच्या शिनजियांग प्रांताला जोडणाऱ्या नव्या रस्त्याचे उद्घाटन केले. हा रस्ता सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या वाखान कॉरिडॉरमधून जात असल्याने त्याकडे विशेष लक्ष वेधले गेले आहे. वाखान कॉरिडॉर हा अफगाणिस्तान, ताजिकिस्तान आणि चीनच्या सीमांजवळ असून भारताच्या गिलगिट-बाल्टिस्तान या प्रदेशाला लागून आहे. पाकिस्तानने १९४८ पासून या प्रदेशावर बेकायदा ताबा मिळवल्याची भारताची भूमिका आहे.**



या प्रांताला मंगोलियापासून भारताच्या लडाख केंद्रशासित प्रदेशापर्यंत सुमारे ५,५०० किलोमीटर लांबीची आंतरराष्ट्रीय सीमा लाभलेली आहे. ही सीमा मंगोलिया, रशिया, कझाकस्तान, किर्गिस्तान, ताजिकिस्तान, अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि भारत अशा आठ देशांना लागून आहे. त्यामुळे या भागातील दळणवळण व्यवस्था मजबूत करणे चीनच्या सुरक्षाविषयक दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहे.

अफगाणिस्तानने बांधलेल्या नव्या रस्त्यामुळे चीनला भारत वगळता इतर शेजारील देशांशी सीमापार व्यापार आणि दळणवळण वाढवण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या महत्त्वाच्या मार्गाच्या उभारणीसाठी मदत करून आणि त्यासाठी आर्थिक पाठबळ पुरवून चीनने अस्थिरतेचा सामना करणाऱ्या शिनजियांग प्रांतातील सुरक्षाविषयक चिंता दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर शेजारी देशांशी संबंध अधिक मजबूत करण्यावरही चीनचा भर आहे. १९९६ मध्ये अफगाणिस्तानच्या राजकारणात तालिबानचा प्रभाव वाढू लागल्यापासून चीनने या संघटनेशी जवळीक साधली होती. १५ ऑगस्ट २०२१ रोजी अफगाणिस्तानमधून आंतरराष्ट्रीय सैन्य माघारी गेल्यानंतर तालिबानने पुन्हा सत्तेवर कब्जा केला होता. त्यानंतर चीन आणि तालिबान यांच्यातील संबंध अधिक दृढ झाल्याचे दिसून येत आहे. तेव्हापासून अफगाणिस्तानची राजधानी काबूलमधील तालिबान सरकार चीनकडे आपल्या सर्वात विश्वासार्ह आंतरराष्ट्रीय भागीदारांपैकी एक म्हणून पाहत आहे.

गेल्या काही वर्षांत पाकिस्तानमध्ये विविध अडचणींचा सामना करावा लागल्याने चीनने अफगाणिस्तानमार्गे समुद्रापर्यंत पोहोचण्यासाठी नव्या पर्यायी मार्गाचा शोध सुरू केला होता. आता हा नवीन रस्ता त्यांना भविष्यात अफगाणिस्तानमार्गे इराणपर्यंत पोहोचण्याचा मार्ग उपलब्ध करून देऊ शकतो. तालिबानकडून या मार्गाच्या सुरक्षेची हमी मिळाल्यास चीनसाठी हा पर्याय अधिक महत्त्वाचा ठरू शकतो. सध्या पाकिस्तानमधील काही चिनी प्रकल्पांच्या व्यवहार्यतेवरही प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. बलुचिस्तान प्रांतातील सातत्यपूर्ण आंदोलने आणि असुरक्षिततेमुळे या प्रकल्पाला अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. चीनच्या मदतीने आणि देखरेखीखाली ग्वादर बंदराचा विकास सुरू झाल्यापासून बलुच बंडखोरांनी चीनच्या हितसंबंधांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

### चीनसाठी वाखान कॉरिडॉर का महत्त्वाचा?

अफगाणिस्तानने केलेली नव्या रस्त्याची निर्मिती चीनसाठी मोठी फायदेशीर मानली जात आहे. या मार्गामुळे चीनचे महत्त्वाचे आर्थिक आणि सुरक्षाविषयक हितसंबंध साध्य होण्यास मदत होणार आहे. या घडामोडीबाबत चीनच्या राजकीय नेतृत्वाने अद्याप मौन बाळगले असले तरी तालिबानच्या या उपक्रमामागे चीनची प्रमुख भूमिका असल्याचे मानले जात आहे. गेल्या अनेक दशकांपासून अफगाणिस्तानमधील विविध राजवटींशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी चीन प्रयत्नशील होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश आता मिळाल्याचे दिसून येत आहे. हा नवनिर्मित रस्ता प्रामुख्याने चीनचे दोन हेतू साध्य करण्यास मदत करू शकतो. पहिले म्हणजे या रस्त्यामुळे वायव्येकडील सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या शिनजियांग प्रांतात चीनची उपस्थिती अधिकच मजबूत होऊ शकते.

# काँग्रेस काळात निवडणूक आयुक्तांना पुरस्कार, मंत्रिपदे वाटली; भाजपाचा आरोप

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी एका पत्रकार परिषदेत काँग्रेस आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. राहुल गांधींचे वर्तन बालिश असून त्यांच्या कृतीतून दुटप्पीपणा दिसून येतो, ज्यामुळे राज्यघटनेच्या प्रत्येक पैलूला धक्का पोहोचत आहे, असा आरोप गोयल यांनी केला. तसेच, काँग्रेसने आपल्या कार्यकाळात मुख्य निवडणूक आयुक्तांना राजकीय पदे आणि पुरस्कार देऊन त्यांचे लाड पुरवल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.**




पत्रकार परिषदेत बोलताना गोयल म्हणाले, "गेल्या काही दिवसांत आपण राहुल गांधींचे वर्तन आणि त्यांच्या कृतीतील दुटप्पीपणा पाहिला आहे. हे केवळ बालिश वर्तन असून यामुळे संविधानाच्या प्रतिष्ठेला धक्का लागत आहे. याउलट, एनडीए सरकारने निवडणूक आयोगाला राष्ट्रीय आणि जनहितासाठी पूर्णपणे स्वतंत्रपणे काम करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. आमच्या सरकारने कधीही कोणत्याही निवडणूक आयुक्तांना राजकीय लाभ देण्याचा प्रयत्न केला नाही."

पीयूष गोयल म्हणाले की, मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून काम पाहिलेल्या टी. एन. शेषन यांच्या प्रामाणिकपणाचे काँग्रेस कौतुक करायची. परंतु, १९९९ मध्ये काँग्रेसने त्यांना भाजपा नेते एल.के. अडवाणी यांच्या विरोधात निवडणुकीच्या मैदानात उतरवले. हा एक प्रकारे त्यांना दिलेला मोबदला नव्हता का? तसेच, १९९६ ते २००१ या काळात मुख्य निवडणूक आयुक्त राहिलेल्या एम. एस. गिल यांना २००० मध्ये पदावर असतानाच 'पद्मविभूषण' या देशाच्या दुसऱ्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गोयल यांनी सवाल केला की, "हा एक प्रकारचा प्रलोभनाचा किंवा लाचेचा भाग नव्हता का?" नंतरच्या काळात काँग्रेसने त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळातही स्थान दिल्याचं ते म्हणाले.

काँग्रेसने आपल्या काळात दोन माजी मुख्य निवडणूक आयुक्तांची राज्यपाल म्हणून नियुक्ती केली. तसेच, एका प्रकरणात मुख्य निवडणूक आयुक्तांनी तक्रार केली होती की त्यांच्या हाताखालील एक निवडणूक आयुक्त पूर्णपणे काँग्रेसचे एजंट म्हणून काम करत आहेत, तरीही तत्कालीन काँग्रेस सरकारने त्या अधिकाऱ्याला पदावरून हटवण्यास नकार दिला होता.

### काँग्रेसच्या काळात प्रचंड पक्षपातीपणा

गोयल यांनी शेवटी सांगितले की, काँग्रेसने प्रशासकीय व्यवस्थेत जेवढा पक्षपातीपणा दाखवला आहे, तेवढा इतर कोणत्याही सरकारच्या काळात पाहायला मिळालेला नाही. एनडीए सरकारने नेहमीच निवडणूक आयुक्तांना कायद्याच्या चौकटीत राहून प्रामाणिकपणे काम करण्याची मुभा दिली आहे. लोकशाही व्यवस्थेची विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि निष्पक्षता अत्यंत महत्त्वाची आहे. निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थांनी कोणत्याही दबावाशिवाय आपल्या जबाबदाऱ्या पार पाडणे अपेक्षित आहे.

# विजयच्या ट्रेनची अखेर प्रतीक्षा संपली!

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता विजय सेतुपती पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर आपल्या अभिनयाची जादू दाखवण्यासाठी सज्ज झाला आहे. त्याच्या आगामी तमिळ थ्रिलर 'ट्रेन' चित्रपटाची गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरू आहे. चाहते जवळपास तीन वर्षांपासून या चित्रपटाच्या प्रदर्शनाची प्रतीक्षा करत होते. अखेर निर्मात्यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली असून, त्यामुळे चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे. निर्माते कलाइपुली एस. थानू यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून 'ट्रेन'च्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. त्यानुसार, हा चित्रपट ४ डिसेंबर २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. दीर्घकाळापासून या चित्रपटाची वाट पाहणाऱ्या चाहत्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे. या चित्रपटात विजय सेतुपतीसोबत अभिनेत्री श्रुती हासन महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. थरारक कथानक आणि दमदार कलाकारांची फळी यामुळे चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये आधीपासूनच उत्सुकता आहे. विशेष म्हणजे, चित्रपटाचा प्रकार थ्रिलर असला तरी कथेला भावनिक पैलूची जोड देण्यात आली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, 'ट्रेन'ची कथा अशा एका व्यक्तीभोवती फिरते, ज्याने जगण्याची इच्छा गमावलेली असते. आपल्या पत्नीच्या कबरीवर झाड लावण्याच्या उद्देशाने तो रेल्वे प्रवासाला निघतो. मात्र, या प्रवासादरम्यान घडणाऱ्या काही अनपेक्षित घटनांमुळे त्याच्या आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू लागतो. हळूहळू त्याला जीवनाचे महत्त्व उमगू लागते. विजय सेतुपती आणि श्रुती हासन यांच्याव्यतिरिक्त 'ट्रेन'मध्ये नासर, युगी सेथू, नारायण आणि के. एस. रविकुमार यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन मिस्किन यांनी केले असून, त्यांनीच चित्रपटाला संगीतही दिले आहे.






## बिपाशा बासू पुन्हा वेब सिरीजमध्ये

अभिनेत्री बिपाशा बासू सहा वर्षांनंतर बॉलीवूडमध्ये कमबॅक करणार आहे. 2022 मध्ये बिपाशाने मुलगी देवीला जन्म दिल्यानंतर काही काळ आता ती सिनेक्षेत्रापासून दूर राहिली. मात्र आता बिपाशा वेब सिरीजच्या माध्यमातून पुन्हा एकदा काम करण्यास सज्ज होणार आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक हंसल मेहता यांच्या आगामी वेब सीरीजमध्ये बिपाशा बसू एका मुख्य भूमिकेत झळकणार आहे. 'बॉलिवूड हंगामा'च्या वृत्तानुसार, बिपाशा बासूच्या आगामी वेब सीरिजचे दिग्दर्शन हंसल मेहता करत आहेत. त्यांनी 'शाहिद' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जिंकला होता. बिपाशाव्यतिरिक्त, या सीरिजमध्ये अभिनेता सनी कौशल जो कतरिना कैफचा दीर आहे हा देखील एका महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. या सीरीजमध्ये सनी कौशल एका प्रामाणिक पोलिसाच्या भूमिकेत आहे, जो सिस्टीममधील आणि सिस्टिमबाहेरील लोकांशी संघर्ष करताना दिसणार आहे. बिपाशा बासूने 'राज', 'जिस्म', 'नो एंट्री', 'कॉर्पोरेट' आणि 'रेस' यांसारख्या अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. थ्रिलर आणि हॉरर चित्रपटांमधील तिच्या उत्तम कामगिरीसाठी तिची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. बिपाशा बासूला अभिनेता आणि तिचे पती करण सिंग ग्रोवरच्या क्राइम थ्रिलर वेबसिरीज डेंजरस मध्ये शेवटची भूमिका साकारताना पाहिले होते. ती वेबसिरीज 2020 मध्ये ओटीटी वर प्रदर्शित केली होती. मात्र आता बिपाशा तब्बल ६ वर्षांनी अभिनय क्षेत्रात कमबॅक करत असल्याने चाहत्यांकडूनही आनंद व्यक्त केला जात आहे.



## भार्गवी चिरमुलेचे ६ वर्षांनंतर कमबॅक

अभिनेत्री भार्गवी चिरमुले ६ वर्षांनंतर स्टार प्रवाहवर कमबॅक करणार आहे. यात ती निगेटिव्ह भूमिका साकारणार आहे. विशाखा शुक्रे असं तिच्या व्यक्तिरेखेचं नाव आहे. एका वेगळ्या भूमिकेत ती या मालिकेत पाहायला मिळणार आहे. 'मराठी मिडियम' असे तिच्या नव्या मालिकेचे नाव आहे. विशाखा या तिच्या भूमिकेबद्दल बोलायचे झाले तर, एका मोठ्या बिझनेस फॅमिलीमधून विशाखा आलेली आहे. तिचा नवरा चांगला असला तरी कर्तृत्वाच्या बाबतीत कमी पडतो, हे तिने फार पूर्वीच ओळखलं होतं. त्यामुळे आपल्या मुलाने वडिलांसारखं होऊ नये, यासाठी तिने त्याच्या संगोपनात कोणतीही कसर सोडलेली नाही. आपल्या मतांवर ठाम असलेली विशाखा आपल्या आजूबाजूच्या जगाकडे एका वेगळ्याच नजरेने पाहते. विशाखाला प्रत्येक गोष्ट परफेक्ट हवी असते. ब्रँडेड नसलेल्या गोष्टींबद्दल तिला चीड आहे. अस्वच्छपणा तिला अजिबात सहन होत नाही. जुन्या चालीरीती आणि परंपरांना तिच्या लेखी फारसं महत्त्व नाही. विशाखाला प्रत्येक गोष्ट परफेक्ट हवी असते. ब्रँडेड नसलेल्या गोष्टींबद्दल तिला चीड आहे. अस्वच्छपणा तिला अजिबात सहन होत नाही. जेरदेशी ते चांगलं, यावर तिचा विश्वास आहे. त्यामुळे जुन्या चालीरीती आणि परंपरांना तिच्या लेखी फारसं महत्त्व नाही. भार्गवी चिरमुले म्हणाली की, "स्टार प्रवाहसोबत सहा वर्षांनंतर पुन्हा जोडलं जाणं माझ्यासाठी खूप आनंदाची गोष्ट आहे.

# जोश हेझलवूडचा विकेट्सचा षटकार!

## ऑस्ट्रेलियाने डरबान कसोटीत उडवला दक्षिण आफ्रिकेचा धुव्वा

**महाईन्यूज । ऑस्ट्रेलिया**

**मॅट रेनशॉने दोन्ही डावात साकारलेल्या शतकी खेळी आणि जोश हेझलवूडने दुसऱ्या डावात घेतलेल्या ६ विकेट्सच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेचा डरबान कसोटीत २१४ धावांनी धुव्वा उडवला. सँडपेपर गेट प्रकरणानंतर ८ वर्षांनी ऑस्ट्रेलियाचा संघ दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर आहे. या मालिकेवर सँडपेपर गेट प्रकरणाचं सावट आहे. मात्र या कशाचंही दडपण न घेता ऑस्ट्रेलियाने बाजी मारली.**

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाचा संघ १२४/६ अशा स्थितीत सापडला होता. मॅट रेनशॉने तळाच्या फलंदाजांना साथीला घेत डाव सावरला. रेनशॉने .. वर्षानंतर शतक झळकावलं. त्याने २१ चौकार आणि एका षटकारासह १९० धावांची खेळी केली. रेनशॉने कमिन्सच्या साथीने ७व्या विकेटसाठी ८६ धावांची भागीदारी केली. रेनशॉने फिरकीपटू नॅथन लॉयनच्या साथीने ९व्या विकेटसाठी १३४ धावांची मॅरेथॉन भागीदारी साकारली. दक्षिण आफ्रिकेतर्फे विआन मुल्डरने ४ तर मार्को यान्सनने ३ विकेट्स घेतल्या.

दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव २८४ धावांतच आटोपला. आफ्रिकेच्या एकाही फलंदाजाला अर्धशतकी खेळी करता आली नाही. ऑस्ट्रेलियातर्फे कर्णधार पॅट कमिन्सने ३ तर मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड आणि नॅथन लॉयन या त्रिकुटाने प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. ऑस्ट्रेलियाला १०६ धावांची आघाडी मिळाली.

ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात आक्रमक धावगतीने धावा केल्या. त्यांनी ३१४ धावांवर डाव घोषित केला.रेनशॉने ७ चौकार आणि २ षटकारांसह ८२ धावांची खेळी केली. निक मॅडिन्सनने ४८ तर ब्यू वेबस्टरने ३९ तर पॅट कमिन्सने ३२ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाने आफ्रिकेला ४२१ धावांचं आव्हान दिलं.

या प्रचंड लक्ष्यासमोर खेळताना आफ्रिकेच्या फलंदाजांची दाणादाण उडाली. उपकर्णधार एडन मारक्रमने २३७ चेंडूत ७५ धावा करत चिवटपणे प्रतिकार केला मात्र तो अपुराच ठरला. डेव्हिड बेंडिघमने ४६ तर मार्को यान्सनने ३५ धावा केल्या. वेगवान गोलंदाज हेझलवूडने ४९ धावांत ऑस्ट्रेलियाच्या सहा फलंदाजांना माघारी धाडलं.

पहिल्या डावात १९० तर दुसऱ्या डावात ८२ धावांची खेळी करणाऱ्या रेनशॉला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. ही कसोटी जिंकत ऑस्ट्रेलियाने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. दुसरी कसोटी क्वेबेखा इथे १८ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे.



# शुबमन गिलने ICCचा मानाचा पुरस्कार जिंकत इतिहास घडवला!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**शुबमन गिलने ऐतिहासिक कामगिरी करत मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. शुबमन गिलसाठी २०२६ हे वर्ष कमालीचं ठरलं. त्याने यंदा दोन्ही फॉरमॅटमध्ये धावांचा पाऊस पाडत प्रत्येक मालिकेत आपल्या कामगिरीची छाप पाडली आहे. दरम्यान सप्टेंबर महिन्यातही त्याने हीच लय कायम ठेवली आणि त्याच्या या कामगिरीची दखल आयसीसीने घेतली आहे. आयसीसीच्या सप्टेंबर महिन्याचा प्लेअर ऑफ द मंथ पुरस्कार शुबमन गिलला देण्यात आला आहे.**

आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर, त्याने सप्टेंबर महिन्याचा प्रतिष्ठित आयसीसी (ICC) पुरस्कार जिंकण्यात यश मिळवलं आहे. या पुरस्कारासाठी नामांकित झालेले त्याचे सहकारी अभिषेक शर्मा आणि झिम्बाब्वेचा स्टार खेळाडू सिकंदर रझा यांना त्याने मागे टाकलं. तसेच, हा पुरस्कार पाच वेळा जिंकणारा शुबमन गिल पहिलाच भारतीय खेळाडू ठरला आहे. सप्टेंबरमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध खेळल्या गेलेल्या एकदिवसीय मालिकेत त्याने उल्लेखनीय कामगिरी केली होती.

शुबमन गिलची सप्टेंबर महिन्यासाठी 'आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ' म्हणून निवड करण्यात आली आहे. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यांत एकदिवसीय मालिका खेळली गेली; यातील पहिले दोन सामने सप्टेंबरमध्ये झाले आणि गिलने त्या सामन्यांमध्ये ३३३ धावांचा डोंगर उभा करत जबरदस्त कामगिरी केली. पहिल्या सामन्यात गिलने ११० धावांची शानदार खेळी केली, तर दुसऱ्या सामन्यात त्याने नाबाद २२३ धावा केल्या. मात्र, ऑक्टोबरमध्ये खेळल्या गेलेल्या तिसऱ्या सामन्यात केवळ एक धाव काढून तो बाद झाला. पहिले दोन्ही सामने आठ गडी राखून जिंकत भारताने मालिका आपल्या नावावर केली.

इतकंच नाही तर भारताने महिलांचा पुरस्कारही जिंकला आहे. भारतीय संघाची स्टार खेळाडू शफाली वर्मा हिची सप्टेंबर २०२६ साठी 'आयसीसी वुमेन्स प्लेयर ऑफ द मंथ' म्हणून निवड करण्यात आली आहे. शफालीने हा पुरस्कार जिंकण्याची ही दुसरी वेळ आहे; २२ वर्षीय शफालीने यापूर्वी गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये हा पुरस्कार पटकावला होता.



### गिलने इतिहास घडवला

शुबमन गिलने आतापर्यंत पाच वेळा 'आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ' हा पुरस्कार जिंकला आहे. त्याला हा पुरस्कार पहिल्यांदा जानेवारी २०२३ मध्ये मिळाला. त्यानंतर, त्याच वर्षी सप्टेंबरमध्ये त्याने पुन्हा हा सन्मान मिळवला. गिलने फेब्रुवारी २०२५ मध्ये तिसऱ्यांदा आणि जुलै २०२५ मध्ये चौथ्यांदा हा पुरस्कार पटकावला. आता, पाचव्यांदा आयसीसीच्या या पुरस्कारावर त्याने नाव कोरलं आहे. मार्च २०२६ मध्ये संजू सॅमसन विजेता ठरला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।
दि. 14 ऑक्टोबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# दिव्यांगांच्या प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही करणार!

## आमदार महेश लांडगे यांचे आश्वासन; प्रहार अपंग क्रांती संघटनेचे विविध मागण्यांसाठी निवेदन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक विचार करून पुढील योग्य कार्यवाही करू, असे आश्वासन आमदार महेश लांडगे यांनी दिले. प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने दिव्यांगांच्या आर्थिक सहाय्य, घरपट्टी सवलत, स्वयंरोजगार आणि सार्वजनिक सुविधांशी संबंधित मागण्यांचे निवेदन त्यांना देण्यात आले. यावेळी संघटनेच्या प्रतिनिधींनी दिव्यांगांना भेडसावणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.**



आमदार महेशदादा लांडगे स्पोर्ट्स फाउंडेशन व शिवांजली सखी मंच यांच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे नवरात्रोत्सव उत्साहात सुरू आहे. देवीच्या दर्शनासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक भेट देत असून, यानिमित्ताने नागरिक आपल्या समस्या व मागण्यांची निवेदने प्रत्यक्ष आमदार महेश लांडगे यांच्याकडे सादर करत आहेत. याच पार्श्वभूमीवर प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या प्रतिनिधींनी शहरातील दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित मागण्यांचे निवेदन दिले.

दिव्यांग व्यक्तींना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी तसेच दैनंदिन जीवनात समान संधी मिळण्यासाठी महापालिकेच्या स्तरावर आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी संघटनेने केली आहे. प्रलंबित प्रश्नांबाबत महापालिका आयुक्तांना आवश्यक निर्देश देऊन तातडीने सकारात्मक कार्यवाही व्हावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

स्वतःच्या मालकीच्या घरात राहणाऱ्या पात्र दिव्यांग व्यक्तींना घरदुरुस्ती आणि आवश्यक सुधारणा करण्यासाठी एकरकमी दोन लाख रुपयांचे अनुदान द्यावे, अशी प्रमुख मागणी आहे. घरपट्टीतील ५० टक्के सवलतीसाठी इंडेक्स-२ उपलब्ध नसलेल्या दिव्यांगांना पर्यायी मालकी कागदपत्रांच्या आधारे लाभ द्यावा. तसेच मालमत्ता नोंदीत 'भोगवटादार' म्हणून नोंद असलेल्या पात्र दिव्यांग व्यक्तींनाही ही सवलत मिळावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. सन २०१७ मध्ये साधन-साहित्य खरेदीसाठी दहा हजार रुपयांचे अनुदान मिळालेल्या पात्र दिव्यांग व्यक्तींनाही सध्याच्या नियमानुसार एक लाख रुपयांचे अर्थसहाय्य द्यावे, असे निवेदनात म्हटले आहे. पूर्वी मिळालेले साहित्य कालांतराने खराब किंवा वापरण्यायोग्य राहिले नसल्याने या लाभार्थ्यांच्या गरजांचा पुन्हा विचार करण्याची आवश्यकता संघटनेने मांडली आहे.

दिव्यांग व्यक्तीने दिव्यांग व्यक्तीशी विवाह केल्यास दाम्पत्याला मिळणाऱ्या दोन लाख रुपयांच्या अर्थसहाय्य योजनेचा लाभ १ एप्रिल २०१३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने द्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. दिव्यांग-अव्यंग विवाहाच्या अर्थसहाय्य योजनेच्या धर्तीवर दोन्ही योजनांमध्ये समानता राखावी, अशी संघटनेची भूमिका आहे. स्वयंरोजगाराच्या प्रश्नावरही निवेदनात भर देण्यात आला आहे. सन २०१२ पूर्वी परवाना मिळालेल्या दिव्यांग स्टॉलधारकांना त्याच ठिकाणी व्यवसाय सुरू ठेवण्यास परवानगी द्यावी. यासंबंधी निवेदनात नमूद केलेल्या आदेशांची महापालिका स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

महापालिकेची उद्याने, बागा आणि मनोरंजन केंद्रांमध्ये दिव्यांगांना सहज प्रवेश व वापर करता यावा, यासाठी रॅम्प, सुगम मार्ग आणि अनुकूल स्वच्छतागृहे उपलब्ध करावीत. महापालिकेच्या सर्व इमारतींचे सुगम्यता परीक्षण अर्थात 'ॲक्सेसिबिलिटी ऑडिट' करून आवश्यकतेनुसार रॅम्प, लिफ्ट आणि इतर सुविधा निर्माण कराव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. या सर्व मागण्या ऐकून घेत आमदार लांडगे यांनी सकारात्मक विचार करून पुढील योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे तसेच संघटनेचे प्रतिनिधी दत्ता भोसले, संगीता जोशी, सागर सुफल, रेवणनाथ कर्डिले आणि संजय मुंडे उपस्थित होते.



### दिव्यांगांच्या प्रमुख मागण्यांकडे लक्ष!

दिव्यांगांना घरदुरुस्तीसाठी दोन लाखांचे अनुदान, घरपट्टीत ५० टक्के सवलत, साधन-साहित्य खरेदीसाठी एक लाखाचे अर्थसहाय्य आणि दिव्यांग विवाहासाठी दोन लाखांच्या अनुदानाचा पूर्वलक्षी लाभ द्यावा. जुन्या परवानाधारक स्टॉलधारकांना व्यवसाय सुरू ठेवण्यास परवानगी मिळावी. तसेच महापालिका इमारती, उद्याने व सार्वजनिक ठिकाणी रॅम्प, लिफ्ट आणि दिव्यांगस्नेही सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा प्रमुख मागण्या प्रहार अपंग क्रांती संघटनेने केल्या आहेत.

> "नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधताना त्यांच्या अडचणीही समजून घेता येत आहेत. दिव्यांग बांधवांना सन्मानाने आणि स्वावलंबीपणे जगण्यासाठी समान संधी व आवश्यक सुविधा मिळाल्या पाहिजेत. प्रहार अपंग क्रांती संघटनेने मांडलेल्या मागण्यांवर सकारात्मक विचार करून महापालिका प्रशासनाशी चर्चा करू. नियमांच्या चौकटीत योग्य कार्यवाही व्हावी आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचावा, यासाठी पाठपुरावा करू."
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# ‘ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो’मुळे मराठा उद्योजकांना प्रोत्साहन

## आमदार महेश लांडगे यांनी नवोदित उद्योजकांना केले आवाहन; मोशीत उद्योजकतेचा महाकुंभ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**उद्योजकांना व्यवसायविस्ताराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मराठा सेवा संघ प्रणित मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्थेच्या वतीने ‘ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो २०२६’चे आयोजन करण्यात आले आहे. मोशी येथील पुणे इंटरनॅशनल एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये (पीआयईसीसी) १५ ते १८ ऑक्टोबरदरम्यान हे प्रदर्शन होणार आहे. या आयोजनाच्या निमित्ताने आमदार महेश लांडगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**




गुरूवार दि.१५ ऑक्टोबर रोजी प्रदर्शनाला सुरूवात होईल. दि. १६, १७ आणि १८ ऑक्टोबर असे ४ दिवस मोशी येथे प्रदर्शन होणार आहे. प्रदर्शनासाठी एक हजारांहून अधिक स्टॉल्स आणि सात लाखांहून अधिक अभ्यागतांचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. हे आकडे अपेक्षित सहभागाचे असून, विविध उद्योगांतील उद्योजक, नवउद्योजक आणि व्यावसायिकांना एकत्र आणण्याचा आयोजनाचा उद्देश आहे. व्यवसायांना बाजारपेठेशी जोडणे, उद्योजकांमध्ये सहकार्य वाढविणे आणि नव्या संधींची ओळख करून देणे यावर भर दिला जाणार आहे.

उत्पादन क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम व स्थावर मालमत्ता, वित्तीय सेवा, आरोग्य, कृषी, शिक्षण, वाहतूक, खाद्य व आदरातिथ्य यांसह विविध क्षेत्रांचा समावेश प्रदर्शनाच्या नियोजनात आहे. महिला उद्योजकता आणि स्टार्टअप्सनाही व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. उत्पादने आणि सेवांचे सादरीकरण करण्यासोबतच संभाव्य ग्राहक, वितरक आणि गुंतवणूकदारांशी संपर्क साधण्याची संधी उद्योजकांना मिळावी, अशी आयोजनाची संकल्पना आहे.

लहान व्यवसायांना अनुभवी उद्योजकांशी जोडणे, व्यावसायिक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे आणि स्थानिक उद्योगांना व्यापक बाजारपेठेची दृष्टी देणे, ही या उपक्रमाची प्रमुख उद्दिष्टे असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. अधिक उद्योजक घडविणे, व्यवसाय सक्षम करणे आणि त्यातून रोजगाराच्या संधी वाढविणे यासाठी सामूहिक व्यासपीठ उभारण्यावर संस्थेचा भर आहे.

महिला उद्योजकांना व्यवसायाची ओळख वाढविण्यासाठी आणि विविध क्षेत्रांतील व्यावसायिकांशी संवाद साधण्यासाठीही प्रदर्शनात संधी उपलब्ध करून देण्याचे आयोजकांचे नियोजन आहे. व्यवसायवृद्धीसाठी आवश्यक संपर्क, बाजारपेठेची माहिती आणि सहकार्याच्या शक्यता एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात, हा त्यामागील उद्देश आहे.



> “आपल्या तरुणांनी नोकरीच्या संधी शोधण्या-सोबतच उद्योग उभारून रोजगार देणारे बनावे. त्यासाठी त्यांच्या कल्पनांना मार्गदर्शन, उत्पादनांना बाजारपेठ आणि मेहनतीला संधी मिळणे आवश्यक आहे. मोशीतील ‘ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो’सारखे व्यासपीठ नवउद्योजकांना अनुभवी उद्योजकांशी जोडण्यासाठी महत्त्वाचे ठरू शकते. तरुणांनी, महिला उद्योजकांनी आणि लघु व्यावसायिकांनी या संधीचा लाभ घ्यावा. आपल्या मातीतला उद्योजक मोठा झाला, तर अनेक कुटुंबांना आर्थिक बळ मिळेल आणि शहराच्या विकासाला चालना मिळेल.
>
> - **महेश लांडगे**, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्समध्ये संस्थापक दिन उत्साहात साजरा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्सच्या वतीने संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष माननीय श्री. विनायकराव भोंगाळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून संस्थापक दिन (फाउंडर्स डे) उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीचा गौरव, संस्थापकांच्या दूरदृष्टीचा सन्मान आणि भावी पिढीच्या उज्ज्वल भवितव्याचा संकल्प अशा त्रिसूत्री भावनेतून हा सोहळा उत्साहात पार पडला.**




या कार्यक्रमाला संस्थेअंतर्गत दिघी, मोशी आणि चऱ्होली येथील शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेच्या विविध शाखांतील कर्मचाऱ्यांच्या एकत्रित सहभागामुळे कार्यक्रमाला कौटुंबिक स्वरूप प्राप्त झाले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या स्वागताने झाली. संस्थापक दिनाचे औचित्य साधून संगीत व कला विभागाच्या वतीने आकर्षक कलाविष्कार सादर करण्यात आले. विविध शाखांतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी आपल्या मनोगतातून संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या विकासाचा आढावा घेतला. संस्थेच्या उभारणीसाठी अध्यक्ष श्री. विनायकराव भोंगाळे यांनी घेतलेले परिश्रम, त्यांची दूरदृष्टी, शिक्षणाप्रती असलेली बांधिलकी आणि समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी केलेले कार्य यांचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालिका तथा नगरसेविका मा. सौ.कविता भोंगाळे पाटील होत्या. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंजली भागवत, विपणन अधिकारी श्री. शैलेंद्र सिंग, शैक्षणिक संचालिका श्रीमती संगीता गजभारे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

आपल्या मनोगतात अध्यक्ष श्री. विनायकराव भोंगाळे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच पालकांच्या अपेक्षा आणि सामाजिक जबाबदारी यांवर विशेष भर दिला. “आजचे विद्यार्थी हे उद्याच्या राष्ट्राचे शिल्पकार आहेत. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेत यश मिळवून देणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट नसून, त्यांच्यामध्ये विचारशक्ती, आत्मविश्वास, मूल्यांची जाणीव आणि समाजाप्रती जबाबदारी निर्माण करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय आहे,” असा विचार त्यांनी मांडला.

दैनंदिन जीवनातील वाचनाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय जोपासावी, ज्ञानाच्या कक्षा रुंदावाव्यात आणि चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित करावी, असे आवाहन केले. बदलत्या काळात नोकरीच्या संधी शोधण्याबरोबरच रोजगारनिर्मिती करणारे उद्योजक घडणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी नवकल्पना, कौशल्यविकास आणि उद्योजकतेची मानसिकता अंगीकारून स्वावलंबी बनावे, असेही त्यांनी सांगितले.

आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांमुळे भविष्यात शिक्षण, उद्योग आणि रोजगार क्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होणार असल्याचे सांगत, विद्यार्थ्यांनी या तंत्रज्ञानाचा केवळ वापरकर्ता न राहता त्याचा सर्जनशील, जबाबदार आणि समाजोपयोगी उपयोग करणारा नागरिक बनावे, असा संदेश त्यांनी दिला.

“वाचनातून ज्ञान, ज्ञानातून कौशल्य, कौशल्यातून उद्योजकता आणि उद्योजकतेतून राष्ट्राची प्रगती साधली जाते. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत; मात्र ती पूर्ण करण्यासाठी मेहनत, शिस्त, सातत्य आणि प्रामाणिकपणा यांची जोड द्यावी,” हा त्यांच्या विचारांचा मध्यवर्ती संदेश उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

### शिक्षणाच्या माध्यमातून समाजविकासाचा संकल्प

**संस्थापक दिन हा केवळ एका व्यक्तीच्या वाढदिवसाचा आनंदोत्सव नसून संस्थेच्या ध्येयधोरणांचे पुनर्स्मरण करण्याचा आणि भविष्यातील शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा देण्याचा दिवस असल्याची भावना या कार्यक्रमातून व्यक्त झाली. गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थिकेंद्रित दृष्टिकोन, शिक्षकांचे योगदान आणि सामाजिक बांधिलकी यांच्या बळावर संस्थेने केलेल्या वाटचालीचा गौरव करत भविष्यातही शैक्षणिक क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करण्याचा निर्धार यावेळी अधोरेखित झाला.**

# अवध राजपूत संघाच्या सामाजिक कार्यासाठी हक्काची जागा द्या!

## आमदार महेश लांडगे यांच्याकडे आग्रही मागणी; हक्काच्या जागेअभावी उपक्रमांच्या आयोजनावर मर्यादा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**ज्येष्ठ नागरिक, महिला आणि तरुणांसाठी राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांना गती देण्यासाठी योग्य सार्वजनिक जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी अवध राजपूत विकास संघाने केली आहे. संघाचे अध्यक्ष उमाशंकर सिंह यांनी यासंदर्भात भाजपाचे आमदार महेश लांडगे यांना निवेदन दिले असून, संबंधित प्रशासनामार्फत जागेची पाहणी करून आवश्यक मंजुरीची कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.**



अवध राजपूत विकास संघाच्या माध्यमातून परिसरातील समाजघटकांच्या हितासाठी सातत्याने सामाजिक उपक्रम राबविले जातात. मात्र, या उपक्रमांचे नियमित आणि प्रभावी आयोजन करण्यासाठी हक्काची जागा नसल्याने अडचणी येत आहेत. रचनात्मक आणि सामाजिक कामांसाठी योग्य सार्वजनिक जागा उपलब्ध नसल्यामुळे संस्थेच्या कार्यावर मर्यादा येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ज्येष्ठ नागरिकांना एकत्र येण्यासाठी, महिलांच्या सहभागातून सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी आणि तरुणांना विधायक कार्याशी जोडण्यासाठी योग्य जागेची आवश्यकता आहे. अशी जागा उपलब्ध झाल्यास संस्थेच्या उपक्रमांमध्ये सातत्य राखणे आणि अधिक नागरिकांपर्यंत पोहोचणे शक्य होईल, अशी भूमिका संघाने मांडली आहे. या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना योग्य जागेची पाहणी करण्याचे निर्देश द्यावेत. जागा निश्चित करून ती सामाजिक कार्यासाठी उपलब्ध करण्याबाबत आवश्यक मंजुरीची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

आमदार महेश लांडगे जनहिताच्या, सामाजिक आणि विकासात्मक कामांना प्राधान्य देतात, असा उल्लेख संघाने निवेदनात केला आहे. सामाजिक उपक्रमांसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या मागणीवरही सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. निवेदनात संघाचे अध्यक्ष उमाशंकर सिंह, उपाध्यक्ष राजेंद्र सिंह, कोषाध्यक्ष ओमशंकर सिंह आणि संस्थापक सदस्य राजेश सिंह यांची नावे नमूद आहेत. सामाजिक कार्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून संस्थेच्या विधायक उपक्रमांना बळ द्यावे, असे आवाहन अवध राजपूत विकास संघाने केले आहे.

> ज्येष्ठ नागरिक, महिला आणि तरुणांसाठी विधायक उपक्रम राबविणाऱ्या संस्थांना बळ देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. अवध राजपूत विकास संघाच्या जागेसंदर्भातील मागणीचा सकारात्मक विचार करून संबंधित महापालिका अधिकाऱ्यांशी चर्चा करू. योग्य जागेची उपलब्धता आणि आवश्यक प्रशासकीय बाबी तपासून, नियमानुसार प्रस्तावाला गती मिळावी यासाठी पाठपुरावा करू. सामाजिक कार्याला हक्काचे व्यासपीठ मिळावे, यासाठी माझे सहकार्य राहील.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# जपान दूतावास सहकार्याने पीसीसीओई मध्ये ‘नो जपान २०२६’ कार्यक्रमाचे आयोजन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे जपानच्या मुंबईतील वाणिज्य दूतावास सहकार्याने ‘नो जपान २०२६’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पीसीसीओईच्या आंतरराष्ट्रीय संबंध कक्ष आणि जपान सुविधा केंद्राद्वारे होणाऱ्या या पाचव्या आवृत्तीचे उद्घाटन शुक्रवारी, ( दि. १६ ऑक्टोबर) सकाळी १०:३० वाजता होईल. सर्वांसाठी मोफत असून पूर्व नाव नोंदणी आवश्यक आहे.**

PCET's Pimpri Chinchwad College of Engineering
PCCOE
"Knowlege Brings Freedom"
Progress Credibility Confidence Optimism Excellence
Since 1999

जपान एक्सटर्नल ट्रेड ऑर्गनायझेशन चे प्रतिनिधी, उद्योग तज्ञ मार्गदर्शन करतील. ते जपान मधील उच्च शिक्षण, शिष्यवृत्ती, इंटर्नशिप, प्लेसमेंट, करिअरचे मार्ग, तांत्रिक प्रगती, उद्योगाच्या अपेक्षा आणि जपानी कार्यपद्धती याबद्दल माहिती देतील. जपान मधील उद्योग, शिक्षण, संस्कृती, शैक्षणिक, व्यावसायिक आणि सांस्कृतिक संधीं बद्दल माहिती दिली जाईल. हा उपक्रम पीसीसीओईच्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय ओळख निर्माण करून देण्यासाठी आणि जागतिक शैक्षणिक, संशोधन व करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या चालू असलेल्या प्रयत्नांना पूरक आहे. भारतातील विद्यार्थी आणि जपानमधील शैक्षणिक संस्था व उद्योग यांच्यात अधिक सामंजस्य आणि सहभाग वाढवण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून विकसित झाले आहे असे उपक्रम विद्यार्थ्यांना व्यापक जागतिक दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करतात अशी माहिती पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी दिली.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट
॥ सा विद्या या विमुक्तये ॥
PIMPRI CHINCHWAD EDUCATION TRUST
A Trusted Brand in Education Since 1990..

पीसीसीओईच्या आंतरराष्ट्रीय संबंध विभागाच्या अधिष्ठाता डॉ. रोशनी राऊत यांनी माहिती दिली की, विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय संधी शोधण्यासाठी प्रोत्साहित करणे. भारत व जपान यांच्यात अधिक सक्षम शैक्षणिक व व्यावसायिक संबंध निर्माण करणे या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



# एमआयटी एसीएस महाविद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती

## मास्टरकार्डच्या आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी फिशिंग, सुरक्षित पासवर्ड आणि ऑनलाइन गोपनीयतेबाबत मार्गदर्शन

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**जागतिक सायबर सुरक्षा जनजागृती महिन्यानिमित्त आळंदी (देवाची) येथील एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात (स्वायत्त) ८ ते १० ऑक्टोबर दरम्यान तीन दिवसीय सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थी कल्याण विभागाच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचा सायबरइंटेल क्लब आणि डिझाइन ॲनालिटिक्स अँड सायबर सिक्युरिटी (डीएसीएस) विभाग यांनी संयुक्तपणे या उपक्रमाचे आयोजन केले होते. ऑनलाइन सुरक्षितता, फिशिंगपासून बचाव आणि सायबर धोक्यांना आळा घालणे याविषयी महाविद्यालयात जनजागृती करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.**





पहिल्या दिवशी 'सायबर गुन्हे जनजागृती : धोके ओळखा, डिजिटल संरक्षण मजबूत करा' या विषयावर तज्ज्ञ सत्र झाले. मास्टरकार्डचे ग्लोबल हेड (एंटरप्राइज प्रोटेक्शन अँड रिजनल सिक्युरिटी) नील पार्कर आणि चीफ रिजनल सिक्युरिटी ऑफिसर व आयटी ऑडिट डायरेक्टर श्यामकुमार नायर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. फिशिंगपासून बचाव, सुरक्षित पासवर्डचा वापर, एंटरप्राइज सुरक्षा आणि ऑनलाइन गोपनीयता याविषयी त्यांनी प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा प्रश्नमंजूषा घेण्यात आली.

दुसऱ्या दिवशी सायबर सुरक्षेचा संदेश सर्जनशीलपणे पोहोचवण्यासाठी डिजिटल पोस्टर निर्मिती आणि सायबर जनजागृती रील स्पर्धा घेण्यात आली. तिसऱ्या दिवशी फसवणुकीच्या पद्धती उलगडणारी सोशल इंजिनिअरिंग रोल-प्ले सत्रे झाली. समारोप समारंभात विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे व सहभागींना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. सहयोगी अधिष्ठाता (विद्यार्थी कल्याण) डॉ. सुनील महाजन, डीएसीएस विभागप्रमुख डॉ. बरीन शेख आणि सायबरइंटेल क्लबच्या समन्वयक गुणा धोंडवड यांनी उपक्रमाचे नियोजन केले. विद्यार्थ्यांनी उपक्रमात मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



# शालेय राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी राजमाता जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालयातील तीन खेळाडूंची निवड

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

प्रवरा कन्या विद्या मंदिर प्रवरानगर तालुका राहता जिल्हा अहिल्यानगर येथे झालेल्या शालेय विभागस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत राजमाता जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालयातील कु. रुद्र खामकर (48kg), कु. प्रज्वल सीतापुरे(63kg) निश्चय जीनवाल (81kg) या तीन खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळविला. त्यामुळे या तिन्ही ही खेळाडूंची जिल्हा क्रीडा संकुल परभणी येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच कु. साईराज हळीकर (52kg) कु. मल्हार कपिले (54kg), कु. पार्थ तांबेरे (75kg) कु. प्राची वाघमोडे(48kg) व चैत्राली लांडगे(75kg) या 05 खेळाडूंनी द्वितीय क्रमांक संपादन केलेला आहे. सदर खेळाडूंना कनिष्ठ महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा.गोपीचंद करंडे यांनी विशेष मार्गदर्शन केले.

या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरी चे प्रथम आमदार मा.श्री. विलासराव लांडे साहेब यांनी विशेष अभिनंदन करून खेळाडूंना विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार व पिं.चि. मनपा. स्थायी समितीचे मा.अध्यक्ष श्री अजितभाऊ गव्हाणे, संस्थेचे सचिव श्री सुधीर मुंगसे सर, पिं.चिं. मनपाचे नगरसेवक व संस्थेचे विश्वस्त विक्रांतदादा लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कानडे के.जी , उपप्राचार्य प्रा.किरण चौधरी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ.अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा.योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले.

# डॉ. बिरादार एच. डी. यांना प्रतिष्ठेचा 'स्टार एज्युकेशन अवॉर्ड २०२६' पुरस्कार प्रदान

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, आकुर्डी, पुणे यांच्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची बाब म्हणजे डॉ. बिरादार एच. डी. यांची प्रतिष्ठेच्या 'स्टार एज्युकेशन अवॉर्ड्स २०२६' या पुरस्कारासाठी विजेते म्हणून निवड झाली आहे. त्यांना 'सर्वोत्कृष्ट कनिष्ठ महाविद्यालय – राज्य मंडळ या श्रेणीमध्ये हा सन्मान मिळाला आहे.**




ESFE आणि द टाइम्स ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन ८ ऑक्टोबर २०२६ रोजी हॉल क्रमांक ५, नेस्को, बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव पूर्व, मुंबई येथे करण्यात आले होते.

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, गुणवत्तापूर्ण शिक्षणाप्रती असलेली बांधिलकी, शैक्षणिक उत्कृष्टतेसाठीचे सातत्यपूर्ण प्रयत्न आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य यांची दखल घेऊन हा प्रतिष्ठेचा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

डॉ. बिरादार एच. डी. यांचे शैक्षणिक क्षेत्रातील समर्पण, दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि उत्कृष्ट कार्य हे या गौरवाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. हा पुरस्कार महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची आणि प्रगतीशील वाटचालीची पावती ठरला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल डी. वाय. पी. कॅम्पसचे विश्वस्त श्री. तेजस पाटील सर, रिअर ॲडमिरल अमित विक्रम सर, मुख्य वित्त अधिकारी (CFO) श्री. बी. एच. शर्मा सर, तसेच महाविद्यालयातील सहकारी आणि शिक्षकवृंद यांनी डॉ. एच. डी. बिरादार सरांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.